# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 14 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १४ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- महिलांना आर्थिक ताकद देणं हाच लाडकी बहीण योजनेचा उद्देश – मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- प्रधानमंत्री आवास योजना शहरीचा दुसरा टप्पा राबवण्याला राज्यमंत्रिमंडळाची मंजुरी
- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राला आपला कायम विरोध – विधिज्ञ प्रकाश आंबेडकर यांची स्पष्टोक्ती
- दिवाळीत होणारी हंगामी भाडेवाढ मागे घेण्याचा एसटी महामंडळाचा निर्णय

आणि

- जालना इथं नऊ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचाराच्या निषेधार्थ रास्ता रोको आंदोलन

****

महिलांना आर्थिक ताकद देणं हाच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमागचा उद्देश असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. आज जालना जिल्ह्यात घनसावंगी तालुक्यातल्या कुंभार पिंपळगाव इथं शेतकरी मेळाव्याला ते संबोधित करत होते. लाडकी बहीण योजना कायम सुरू राहणार असून, लाडक्या बहिणींना लखपती करण्याचा त्यांनी पुनरुच्चार केला. आचारसंहितेचा अडथळा येऊ नये, यासाठी या योजनेचे नोव्हेंबरचे पैसे ऑक्टोबर महिन्यातच दिल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले –

***या तुमच्या भावानं तुमच्या हक्काचे पैसे तुमच्या खात्यात टाकण्याचं काम केलेलं आहे. आणि आता तुम्हाला कुणाकडेही मागण्याची गरज नाही. हे करण्याचं काम आणि उद्देश एवढाच होता की आर्थिक ताकद माझ्या बहिणींना मिळाली पाहिजे.***

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, खासदार संदिपान भुमरे उद्योगमंत्री उदय सामंत, सिडको महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट, माजी मंत्री अर्जुन खोतकर, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. ब्ल्यू सफायर कंपनीच्या अन्नप्रक्रिया उद्योगाच्या दुसऱ्या युनिटचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन झालं, यावेळी हिकमत उढाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.
शेतकऱ्यांसाठी वीज बिल माफी, वयोश्री योजना, सुशिक्षित बेरोजगारांना प्रशिक्षण भत्ता, आदी योजनांचा आढावा घेत, मराठवाड्याचा दुष्काळ दूर करण्याची तसंच दुष्काळी अनुदानातून जालना जिल्हा कधीही वगळला जाणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

****

मुंबईत प्रवेश करणाऱ्या पाचही मार्गांवर हलक्या मोटर वाहनांना संपूर्ण पथकर माफी केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले –

***आज मुंबईतले पाचही टोलनाके बंद करून आलोय. म्हणजे आता तुम्हाला तिकडे जाताना गाडी उभी करायला लागणार नाही मुंबईच्या पाचही टोल नाक्यावर. खरं म्हणजे संपूर्ण ते टोलनाक पाचही आपण लाईट वेटच्या आपल्या गाड्यांना टोल माफी सूट दिलेली आहे.***

आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. आज रात्री बारा वाजल्यापासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे.
राज्यात प्रधानमंत्री आवास योजना शहरीचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.
आगरी समाजासाठी महामंडळ स्थापन करणं, राज्य शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करणं, खंड क्षमापित झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करणं, किल्लारीच्या शेतकरी सहकारी कारखान्याला व्याजासह

कर्जमाफी, तसंच अडचणीतल्या सहकारी उपसा जलसिंचन योजनांचं थकीत कर्ज माफ करण्यासही राज्य मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजना, आष्टी उपसा सिंचन योजनेसह, वैजापूरच्या शनीदेवगाव बंधाऱ्यास आणि पुणे मेट्रो रेल टप्पा-दोन मधल्या रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

मराठी भाषेविषयक जनजागृतीसाठी पंधरवडा साजरा करणं, अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळासाठी तसंच उमेदसाठी अभ्यासगट स्थापन करणं आणि कौशल्य विद्यापीठाचं पद्मविभूषण रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ असं नामकरण करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

****

माजी राज्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या निधनाबद्दल मंत्रिमंडळ बैठकीत शोक व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी अटकेत असलेल्या दोघांपैकी धर्मराज कश्यप हा आरोपी अल्पवयीन नसल्याचं चाचणीतून सिद्ध झालं आहे. त्यामुळे त्याला देखील २१ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

सिद्दीकी यांच्या हत्येचा खटला जलदगती न्यायालयात चालवू. या प्रकरणातल्या सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करू असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत सांगितलं.

दरम्यान, सिद्दीकी यांच्या हत्याप्रकरणातील आणखी एक आरोपी प्रवीण लोणकर याला मुंबई पोलिसांनी पुण्यातून अटक केली. प्रवीणचा भाऊ शुभम फरार आहे. हे दोघंजण अकोल्यातल्या अकोट इथले रहिवासी आहेत. या दोघांनीच सिद्दीकी यांच्या हत्येचा कट रचल्याचा संशय आहे.

****

आपण निवडून आलो तरी आपला इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राला कायम विरोध राहिल असं वंचित बहुजन आघाडी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष विधिज्ञ प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे. आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत ते बोलत होते. काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांवर त्यांनी टीका केली. अदिवासी आणि ओ बी सी समाजाची एकत्रित मोट आम्ही बांधत असून एक दोन दिवसात हे कार्य शंभर टक्के पूर्ण होईल नंतर आम्ही आमची भूमिका स्पष्ट करणार असल्याचं, आंबेडकर यांनी नमूद केलं.

****

वरुण राजा मुचाकी आणि रोशनी वाछामी या नक्षलवादी दांपत्याने आज गडचिरोली इथं केंद्रीय राखीव दल आणि जिल्हा पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. वरुणच्या अटकेसाठी शासनाने ८ लाख रुपयांचं तर रोशनीसाठी २ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

****

मुंबईहून न्यूयॉर्कला जाणाऱ्या एअर इंडियाचं विमान बॉम्बनं उडवण्याची धमकी मिळाल्यानंतर आज सकाळी दिल्ली विमानतळावर ते तातडीनं उतरवण्यात आलं. विमानाची तपासणी केली असता कोणतीही आक्षेपार्ह वस्तू मिळाली नाही. मुंबईहून मस्कतला जाणाऱ्या इंडिगो विमानही बॉम्बनं उडवण्याची धमकी मिळाली होती. त्यानंतर या विमानाची कसून तपासणी केली जात आहे. इंडिगोच्या मुंबईहून जेद्दाहला जाणाऱ्या विमानातही बॉम्ब ठेवल्याची धमकी मिळाली. दरम्यान, मुंबई हावडा गाडीही बॉम्बनं उडवण्याची धमकी मिळाल्यानंतर ही गाडी जळगाव रेल्वे स्थानकात थांबवण्यात आली. तिथं संपूर्ण गाडीची तपासणी केली असता कोणतीही आक्षेपार्ह वस्तू न मिळाल्यानं ही गाडी पुढे रवाना करण्यात आली.

****

दिवाळीत गर्दीच्या हंगामामुळे होणारी भाडेवाढ मागे घेण्याचा निर्णय एसटी महामंडळानं घेतला आहे. २५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान ही भाडेवाढ होणार होती. यासंदर्भातलं पत्रक शुक्रवारी महामंडळानं प्रसिद्ध केलं होतं. हे पत्रक मागे घेत असल्याचं एसटी महामंडळानं आज जाहीर केलं.

****

येत्या काळात प्रत्येक गिरणी कामगाराला घर मिळेल, अशी ग्वाही गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी दिली आहे. गिरणी कामगारांना मुंबई महानगर क्षेत्रात सदनिका उपलब्ध करून देण्यासाठी पात्र प्रकल्प प्रवर्तकांना आज हेतू पत्र देण्यात आले त्यावेळी सावे बोलत होते. ही घरं पुढील तीन वर्षामध्ये उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती सावे यांनी दिली.

****

परळी वैजनाथ इथं क्रीडा संकुल उभारण्यासाठी जलालपूर इथली पाच हेक्टर ३० आर जागा मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय ऊर्जा विभागाने घेतला आहे. याबाबातचा शासन निर्णय आज जारी करण्यात आला. ही जमीन क्रीडा विभागास

हस्तांतरित करून क्रीडा संकूल उभारणीबाबतची पुढील कार्यवाही तातडीने सुरू करावी असे निर्देश पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत.

****

जालना शहरातल्या चंदनझिरा भागात नऊ वर्षीय मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या निषेधार्थ आज रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. आंदोलनामुळे जालना–छत्रपती संभाजीनगर मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी सहा संशयितांना ताब्यात घेतलं आहे. या मुलीला गुंगीचे औषध देऊन लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार काल रात्री समोर आला. पीडित मुलीवर छत्रपती संभाजीनगर इथल्या घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

****

नांदेड इथं आज जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी आसूड मोर्चा काढण्यात आला. युवराज छत्रपती संभाजी महाराज यांच्या नेतृत्वात निघालेल्या या मोर्चात सोयाबीनला प्रति क्विंटल साडे आठ हजार रुपये तर कापसाला ११ हजार रुपये प्रति क्विंटल दर द्यावा, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई त्वरित द्यावी, नदीकाठच्या शेतकऱ्यांना दुहेरी अनुदान देण्यात यावे, शेतकऱ्यांचं कर्ज शंभर टक्के माफ करावं आदी मागण्या करण्यात आल्या.

****

वाशिम जिल्ह्याचा दुष्काळग्रस्त जिल्ह्यांच्या यादीत समावेश करावा, सोयाबीन पिकाला रास्त भाव द्यावा, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा, वीज समस्या दूर करावी, आदी मागण्यांसाठी रिसोड इथं आज महाविकास आघाडीतर्फे तहसील कार्यालयावर ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. आघाडीचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते जवळपास ५०० ट्रॅक्टरसह मोर्चात सहभागी झाले होते.

****

आगामी फुले शाहू आंबेडकरी विश्व साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक ऋषीकेश कांबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. थायलंड इथं पटाया इंडियन असोसिएशन या संस्थेच्या भारतीय वंशाच्या सदस्यांच्या मदतीने येत्या पाच जानेवारी २०२५ रोजी बॅकॉक इथं हे संमेलन होणार आहे.

****

ऑलिंम्पिक स्पर्धेत नेमबाजी प्रकारात कांस्य पदक विजेता स्वप्नील कुसळे आणि त्याच्या प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांना अनुक्रमे दोन कोटी रुपये आणि २० लाखांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आज देण्यात आलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते स्वप्नीलला सन्मानित करण्यात आलं.

पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेत गोळाफेक प्रकारात रौप्य पदक जिंकणाऱ्या सचिन खिलारी याला तीन कोटी रुपये तर त्याचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण यांना ३० लाख रुपये तसंच बुडापेस्ट इथं बुद्धिबळ ऑलिम्पियाडमधील विजेते बुद्धीबळपटू विदीत गुजराथी आणि दिव्या देशमुख यांनाही प्रत्येकी एक कोटी रुपये देऊन सन्मानित करण्यात आलं.

****